■ मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १४२ ■ सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### भिंत पडून ६ जण जखमी

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

येथील तोरणानगरमध्ये आज पहाटे गाढ झोपेतील सेट्रींग कामगार जमीर गोलंदाज यांच्यासह कुटुंबावर राहत्या घराची भिंत कोसळल्याने सहाजण जखमी झाले.जखमींवर आयजीएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### पोलीस दलाच्या वाहनांचे लोकार्पण

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली पोलीस मुख्यालयातील आर.सी.पी. वाहन, सांगली व मिरज उपविभागातील दामिनी पथक या वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# महायुतीत खटके... राज्य पातळीवर 'महायुती'ची भाषा ?

## जिल्हा नेते मात्र स्वबळाच्या तयारीत ; सांगली, कोल्हापुरात पडसाद उमटणार

**सांगली : हॅलो प्रभात**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्यापुर्वीच महायुतीतील घटक पक्ष स्वबळाचा नारा देऊ लागल्याने भाजप नेते हडबडले आहे.

महायुतीतील सर्व घटक पक्षांना समवेत घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांना सामोरे गेल्यास महाविकास आघाडीचा पाडाव करता येईल, अन्यथा महायुतीला मतविभाजनाचा दणका बसेल हे भाजप नेत्यांचे गणित आहे. पण जागावाटप समाधानकारक न झाल्यास सांगली, कोल्हापुरात महायुतीचे घटक पक्ष स्वबळावर लढण्याची शक्यता राजकीय जाणकारांमधून व्यक्त होत आहे.

सांगलीत राष्ट्रवादी तर कोल्हापुरात शिवसेना ताकदीने उतरण्याच्या तयारीत आहे, त्या दृष्टीकोनातून त्यांची व्यूहरचनादेखील सुरू आहे. स्थानिक संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे. अशातच आता भाजपसमोर नवे संकट उभे झाले असून सत्तेत सहभागी




असणाऱ्या मित्रपक्षांनी असहकाराची भाषा सुरू केली आहे. छोट्या पक्षांनीदेखील स्वबळावर लढण्याची भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे महायुतीतील एकतेला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. भाजपसह शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या मोर्चेबांधणीलादेखील वेग आला आहे. एकीकडे महायुतीतील पक्ष आपापल्या तयारीला लागले असतानाच आता भाजपसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. सत्तेत सहभागी असणाऱ्या छोट्या पक्षाने थेट स्वबळाची भाषा करत महायुतीविरोधातच दंड थोपटले आहे. यामुळे स्वबळावर लढण्याची भाषा करणाऱ्या भाजपसह आता महायुतीलाच मोठा झटका बसण्याची शक्यता आहे.

राज्य पातळीवर महायुतीच म्हणून लढण्याची तयारी केली जात असतानाच जिल्हा पातळीवर मात्र स्वबळाची भाषा भाजपसह शिवसेना करताना दिसत आहे.

यामुळे अनेक जिल्ह्यात सध्या महायुतीत खटके उडताना दिसत आहेत. अशातच महायुतीत राज्यात सहभागी असणाऱ्या आणि केंद्रात मंत्रीपद मिळालेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने थेट भाजपला इशारा दिला आहे.

भाजपने यावेळी पक्षाला योग्य सन्मानजनक जागा न दिल्यास आपण स्वबळावर लढू अशी घोषणाच केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. यामुळे आता भाजपसमोरील अडचणी वाढल्या आहेत. यामुळे आता महायुतीत जागावाटपावरून ठिणगी पडण्याची शक्यता राजकीय जाणकारांमधून वर्तवली जात आहे.

# पुरग्रस्तांना प्रतीक्षा शासनाच्या मदतीची

## पुरामुळे घरांची पडझड शेतीचे मोठे नुकसान

**सातारा : सूर्यकांत पाटणकर**



ऑगस्टच्या सुरुवातीला मान्सूनच्या विश्रांती घेतलेल्या पावसाने १६ ऑगस्ट नंतर झोडपून काढले. जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागात जोरदार पाऊस कोसळला यामुळे धरणांच्या पाणी पातळीत वाढ होऊन धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग करण्यात आला. त्यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पूर स्थिती निर्माण झाली तर अतिवृष्टीच्या पावसाने घरांची पडझड होऊन शेतीचे हे मोठे नुकसान झाले आहे.

बुधवारी सायंकाळपासून पावसाने उघडीप दिली असून शेतकऱ्यांचे डोळे आता शासनाच्या मदतीकडे लागले आहेत. सातारा जिल्ह्यात वाई महाबळेश्वर पाटण या तालुक्यांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो पश्चिम घाटाच्या डोंगर रांगांमध्ये येणाऱ्या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीच्या पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान होते. गेल्या चार दिवसात अतिवृष्टीच्या पावसाने जिल्ह्यातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत केले होते तर कोयना, धोम, बलकवडी,कन्हेर,तारळी या प्रमुख धरणांमधून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीकाठच्या गावांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तर गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होऊन घरांची पडझड तसेच नागरिकांच्या संसार उपयोगी साहित्याचे ही प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

कोयना धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीकडच्या गावांना धोका निर्माण झाला होता.नागरिकांच्या घरात पाणी घुसल्याने त्यांना तात्पुरते स्थलांतरित करण्यात आले होते.पुरामुळे शासनाने तात्पुरते स्थलांतर करून चार दिवस निवारा व जेवणाची व्यवस्था केली. मात्र पुरामुळे घरादाराचे, शेतीचे, व्यवसायाचे झालेले नुकसान कसे भरून येणार या विवंचनेत सध्या अतिवृष्टीतील पूरग्रस्त आहेत.

जिल्हा प्रशासनाने अद्यापही अतिवृष्टी पूर परिस्थितीत झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सुरुवात केली नसून केवळ पाहणी दौरा चालू आहे.मात्र प्रत्यक्षात आपत्तीग्रस्तांना मदत मिळणे गरजेचे आहे. या पूरग्रस्तांना आता प्रतीक्षा शासनाच्या मदतीची लागली असून शासन केव्हा करणार असा प्रश्न आपत्तीग्रस्तांकडून विचारला जात आहे.

# पूरबाधितांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करा

## ना.चंद्रकांत पाटील ; विविध ठिकाणी पूरपरिस्थितीची पाहणी

**सांगली : हॅलो प्रभात**



पूरस्थितीने बाधित नागरिकांच्या पाठीशी शासन व प्रशासन असून, त्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा द्याव्यात. पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे त्वरित करावेत, असे निर्देश पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. पाटील यांनी जिल्ह्यातील जुने खेड , दत्त मंदिर औदुंबर, मौलानानगर, भिलवडी तसेच सांगली मनपा क्षेत्रातील सूर्यवंशी प्लॉट येथे नुकसानीची पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला. सेकंडरी हायस्कूल, भिलवडी व सहकार भवन, मार्केट यार्ड, सांगली येथील निवारा केंद्रास भेट देऊन पूरबाधित स्थलांतरीतांना दिलेल्या सोयी सुविधांचा आढावा घेतला. अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेली पूरस्थिती, वाहतुकीतील अडथळे, पिकांचे नुकसान, आपत्कालिन सेवांच्या कार्यवाहीची माहिती घेतली.

या दौऱ्यादरम्यान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्र व जिल्ह्यात विविध ठिकाणी पूरपरिस्थितीची पाहणी केली, पूरबाधितांशी संवाद साधला, शहर व जिल्ह्यातील निवारा केंद्रांना प्रातिनिधिक भेट देऊन बाधितांची केलेली सोय व दिलेल्या सुविधा यांची पाहणी करून त्यांना धीर दिला. तसेच भिलवडी येथील निवारा केंद्रात पूरग्रस्तांना देण्यात येणाऱ्या अन्नाचा दर्जा प्रत्यक्ष पूरबाधितांबरोबर भोजन करून तपासला. स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, संवाद साधून पूरस्थिती निर्माण होण्याची कारणे व समस्या जाणून घेतल्या.




# कवठेमहांकाळमध्ये 'मानाच्या दहीहंडीचा थरार'

## साडेपाच लाखांच्यावर बक्षिसे

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**



भाजप कवठेमहंकाळ तालुका व सर्वोत्तम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने सोमवार २५ ऑगस्ट रोजी 'दोस्ती दहीहंडी' स्पर्धा आयोजित केली असून, ही दहीहंडी स्पर्धा ही पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी स्पर्धा असल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

आज (सोमवार दि.२५)रोजी सायंकाळी सात वाजता महांकाली हायस्कूलच्या क्रिडांगणावर या 'दोस्ती दहीहंडी' च्या स्पर्धेचे आयोजन केले आहे.या दहीहंडी स्पर्धात ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांच्या विक्रमी बक्षीसासह साजरी होणार आहे.तरी याचा मोठ्या संख्येने नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन निमंत्रक ईश्वर वनखडे, भाजपाचे राज्य सदस्य मिलिंद कोरे, नगराध्यक्ष रणजीत घाडगे यांनी पत्रकार परिषदेत केले. या परिषदेत मिलिंद कोरे म्हणाले ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्तच्या यावर्षी ५५ कार्यक्रम होत आहेत. गत काही दिवसापूर्वी नागोळे येथे देवाभाऊ केसरी बैलगाडी शर्यतही पार पडली. आता दोस्ती दहीहंडी साजरी होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. 'दोस्ती दहीहंडी' चे नियोजन आ.गोपीचंद पडळकर, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस संदीप गिड्डे-पाटील, भाजपा राज्य परिषद सदस्य मिलिंद कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून, या दहीहंडी उत्सवात 'गुलाबी साडी' फेम संजू राठोड हे उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमात खास मनोरंजनाचे आयोजन, विद्युत रोषणाई, महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था तसेच स्वतंत्र पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कार्यक्रमासाठी दोन स्टेज उभारण्यात येणार असून, या स्पर्धेत नामवंत गोविंदा पथकांचा सहभाग असणार असल्याचे निमंत्रक ईश्वर वनखडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

यावेळ विक्रम कोळेकर,वैभव गुरव, विजय शेजाळ, रवींद्र गाढवे, धनंजय शिंदे, कुमार जाधव, धनाजी पाटील, राहुल गावडे, वैभव सरवदे, गजानन कांबळे, युवराज कोठावळे सह पदाधिकारी उपस्थित होते.

# उच्चांकी लाभांश व तत्पर सेवेची परंपरा कायम ठेवू : आर.डी.माहुली

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**




राजारामबापू कारखान्याच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने गेल्या ५५ वर्षापासून उत्कृष्ठ लाभांश व तत्पर सेवेची परंपरा जपली आहे. भविष्यातही कामगार सभासद केंद्रबिंदू मानून सेवा देवू,असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष आर.डी.माहुली यांनी व्यक्त केला. याप्रसंगी १३ टक्के लाभांश व व्याजावर ५ टक्के रिबेट जाहीर करण्यात आले.

पतसंस्थेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. कारखान्याचे संचालक कार्तिक पाटील, कामगार प्रतिनिधी मनोहर सन्मुख,विकास पवार, सचिव डी.एम.पाटील, कामगार युनियन चे अध्यक्ष राजेंद्र चव्हाण, कार्याध्यक्ष तानाजी खराडे, विश्वनाथ पाटसुते, संस्थेचे उपाध्यक्ष किरण बाबर, सचिव शिरीष जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील, स्व. शंकरराव भोसले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी खेळीखेळीत सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

आर.डी.माहुली म्हणाले, आपण केवळ जास्तीत-जास्त लाभांशाचा आग्रह धरण्या बरोबर कर्जदारांना दिलासा देणे गरजेचे आहे. त्यामुळे आपण १३ टक्के विक्रमी लाभांश देण्याबरोबर कर्जदारांना ५ टक्के रिबेट देत आहोत. यावेळी कायम कामगारांना कर्ज ६ लाख व तातडीचे कर्ज २ लाख,तर हंगामी कामगारांना कर्ज ५ लाख व तातडीचे कर्ज १ लाख अशी कर्ज मर्यादा वाढविण्याची घोषणा करण्यात आली. कार्तिक पाटील म्हणाले, आपण सर्वांनी लाभांश व व्याज दरात सवलत, कर्जाची मर्यादा आदी बाबींचा आग्रह धरताना आपली संस्था ग्राहक भांडार वाढायला हवी,याची काळजी घ्यावी. याप्रसंगी प्रेमनाथ कमलाकर,संभाजी सावंत,महेश पाटील,अनिलकुमार पाटील, संतोष खटावकर,धनाजी लाड यांच्यासह खातेप्रमुख, संस्थेचे संचालक व कामगार सभासद उपस्थित होते.




# गणेशोत्सवाचे स्वरूप बदलू लागले आहे

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला.

हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरु केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे.

या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो.

उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत.

गणेशमंडळांनीरक्तदानशिबिरआयोजितकरावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.

# चंद्रावर पाऊल ठेवणारी पहिली व्यक्ति




२५ ऑगस्ट : नील आर्मस्ट्राँग पुण्यतिथी

नील एल्डन आर्मस्ट्राँगचा जन्म ५ ऑगस्ट १९३० रोजी वाकाकोनेटा, ओहायो येथे झाला. त्याच्या वडिलांचे नाव स्टीफन आर्मस्ट्राँग आणि आईचे नाव वियोला लुईस एंजेल होते. त्याच्या आई-वडिलांना जून आणि डीन ही आणखी दोन मुले होती, ती नीलपेक्षा लहान होती. फादर स्टीफन हे ओहायो सरकारसाठी काम करणारे ऑडिटर होते आणि त्यांचे कुटुंब या कारणासाठी ओहायोमधील अनेक शहरांमध्ये गेले. नील आर्मस्ट्राँगच्या लहानपणी त्याच्या वडिलांची सुमारे २० शहरांमध्ये बदली झाली. या काळात नीलच्या हवाई उड्डाणांमध्ये रस निर्माण झाला. जेव्हा नील पाच वर्षांचा होता. त्याच्या वडिलांनी त्याला २० जून, १९३६ रोजी वॉरेन, ओहायो येथे फोर्ड ट्रायमोटर विमानात बसवले आणि नीलने त्याच्या पहिल्या उड्डाणाचा अनुभव घेतला होता.

१९४७ मध्ये, नीलने वयाच्या सतराव्या वर्षी एरोनॉटिकल इंजिनीअरिंगचा अभ्यास सुरू केला. अभ्यास करण्यासाठी त्यांनी मॅसाच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) देखील स्वीकारले. आर्मस्ट्राँगचा असा विश्वास होता की आपण कुठेही अभ्यास करून सर्वोत्तम शिक्षण घेऊ शकतो. हे शिक्षण त्यांनी पर्डू विद्यापीठात घेतले. महाविद्यालयीन शिक्षण घेणारे ते त्यांच्या कुटुंबातील दुसरे सदस्य होते. आर्मस्ट्राँगला २६ जानेवारी १९४९ रोजी नौदलाकडून कॉल आला आणि पेन्साकोला नेव्ही एअर स्टेशनवर अठरा महिन्यांचे प्रशिक्षण घेतले. वयाची २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांनीच त्याला नेव्हल एव्हिएटर (नेव्हल पायलट) चा दर्जा मिळाला. नीलने आपल्या १६ व्या वाढदिवशी विद्यार्थ्यांचे उड्डाण प्रमाणपत्र मिळविले आणि त्याच वर्षाच्या ऑगस्टमध्ये त्याच्याकडे ड्रायव्हिंग परवाना नसतानाही एकट्याने उड्डाण केले.

### नील आर्मस्ट्राँगचा कमांड पायलट प्रवास

नेव्हल एव्हिएटर म्हणून त्याची पहिली तैनाती सॅन दिएगो येथील फ्लीट एअरक्राफ्ट सर्व्हिस स्काड्रन ७ मध्ये होती. कोरियन युद्धाच्या वेळी युद्धावेळी त्याला उड्डाण करण्याची पहिली संधी मिळाली जेव्हा त्याने २९ ऑगस्ट १९५१ रोजी त्यात उड्डाण केले. ते चित्र काढण्यासाठी उडले. पाच दिवसांनंतर, ३ सप्टेंबर रोजी तिने पहिले सशस्त्र उड्डाण केले.

### पहिले जेट विमान उडवले

किशोरावस्थेत त्यांनी अनेक ईगल स्काऊट पुरस्कार मिळवले आणि त्यांना सिल्व्हर बफेलो पुरस्कारही मिळाला. नील गणित व विज्ञान या विषयात खूपच धारदार होता, त्याला खगोलशास्त्र आणि विश्वशास्त्रात विशेष रस होता. वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने विद्यार्थी पायलटचा परवाना मिळवला. १९५१ मध्ये एकदा युद्धादरम्यान तो उत्तर कोरियावरुन उड्डाण करत होता. त्याच्या एफ ९ एफ पँथर जेटमध्ये उड्डाण करताना त्याने उत्तर कोरियाच्या सैनिकांना त्यांच्या दैनंदिन कामात व्यस्त असल्याचे पाहिले. त्याला हवे असल्यास त्याने मशीनगनने त्यांना गोळी मारू शकली असती, परंतु त्याने आपले बोट ट्रिगरवरून काढून पुढे केले. १९५५ मध्ये ते एरोनॉटिक्सच्या राष्ट्रीय सल्लागार समितीत सामील झाले. नंतर या समितीचे नाव नासा (राष्ट्रीय वैमानिकी आणि अंतराळ प्रशासन) असे करण्यात आले.

### नील आर्मस्ट्राँगचा चंद्राकडे प्रवास

अपोलो ११ च्या प्रक्षेपणादरम्यान, आर्मस्ट्राँगच्या हृदयाचा ठोका प्रति मिनिट ११० बीट्सपर्यंत पोहोचला. आर्मस्ट्राँगला त्याचा पहिला टप्पा सर्वात गोंगाट करणारा वाटला, त्याच्या आधीच्या मिथुन ८ टायटन ख लाँच करण्यापेक्षा. अपोलोच्या कमांड मॉड्यूलमध्ये मिथुनपेक्षा मोठी जागा असावी. आर्मस्ट्राँग रात्री १०.५६ वाजता मून मॉड्यूलमधून बाहेर पडला. त्याने चंद्रावर पहिले पाऊल टाकले होते. त्यावेळी तो म्हणाला होता, 'माणसाचे हे छोटे पाऊल मानवजातीसाठी एक मोठी झेप आहे.' नील एल्डन आर्मस्ट्राँग हे अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ आणि चंद्रावर पाऊल ठेवणारे पहिले व्यक्ती होते. ते एक एरोस्पेस अभियंता, नौदल अधिकारी, चाचणी पायलट आणि प्राध्यापक देखील होते.

### नील आर्मस्ट्राँगचा परतीचा प्रवास

एल्ड्रिन ईगलमध्ये प्रथम आला. दोघांनी मिळून वाहनातील पुलीच्या मदतीने २२ किलो नमुन्यांचे बॉक्स आणि चित्रपट उचलले. त्यानंतर आर्मस्ट्राँग त्या वाहनात चढले. चंद्रायण जीवनरक्षक वातावरणात आल्यानंतर त्याने आपले शूज आणि बॅकपॅक सूट काढून टाकला. त्यानंतर ते झोपी गेले. सात तासांच्या झोपेनंतर, ह्यूस्टन केंद्राने त्याला जागे केले आणि परतीच्या प्रवासाची तयारी करण्यास सांगितले. अडीच तासांनंतर संध्याकाळी ५.५४ वाजता त्यांनी ईगलचे माउंट इंजिन उडाले. कोलंबियाच्या नियंत्रण वाहनात त्याचा साथीदार कालीन चंद्राच्या कक्षेत त्याची वाट पाहत होता. चंद्राच्या पृष्ठभागावर अडीच तासांनंतर, तो अनेक उपकरणे, अमेरिकन ध्वज आणि पायऱ्यांवर एक प्लेट सोडून चंद्राच्या पृष्ठभागावर आला. सुमारे २.३० तास नील आणि एल्ड्रिनने चंद्राचे काही नमुने गोळा केले आणि त्यांच्यावर प्रयोगही केले. त्याने स्वत: च्या पायाच्या चिन्हासहित बरेच फोटो काढले. २४ जुलै रोजी अपोलो ११ पृथ्वीवर परत आला. वाहन प्रशांत महासागरात बुडले, ते यूएसएस हॉर्नेटने उचलले. अध्यक्ष निक्सन स्वतः त्यांचे स्वागत करण्यासाठी जहाजात उपस्थित होते. काही दिवस प्रवाशांना वेगळे ठेवण्यात आले. चंद्राच्या धूळातील अज्ञात संशयित परजीवीची उपस्थिती पृथ्वीच्या वातावरणात पसरण्यापासून रोखण्यासाठी हे केले गेले.नंतर या भीती निराधार असल्याचे सिद्ध झाले. १३ ऑगस्ट १९६९ रोजी अंतराळवीर बाहेर आले. त्याच संध्याकाळी लॉस एंजेलिसमध्ये या प्रवाशांचा सन्मान करण्यासाठी मेजवानी देण्यात आली. ज्यात अमेरिकन काँग्रेसचे सदस्य, ४४ राज्यपाल, मुख्य न्यायमूर्ती आणि ८३ देशांचे राजदूत आले. प्रवाशांना अमेरिकेचा सर्वोच्च सन्मान प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडम देण्यात आला. १६ सप्टेंबर १९६९ रोजी या तिन्ही प्रवाश्यांनी अमेरिकन काँग्रेसला संबोधित केले. पृथ्वीवर परतल्यानंतर तिन्ही अंतराळवीरांचे खूप कौतुक करण्यात आले. त्यांच्या सन्मानार्थ न्यूयॉर्क शहरात एक परेडही आयोजित करण्यात आली. आर्मस्ट्राँगला त्याच्या अतुलनीय कार्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत, ज्यात काँग्रेसनल स्पेस मेडलचा समावेश आहे.

### ८२ व्या वर्षी हृदयविकारामुळे निधन

नीलचे आयुष्य टोकदार जीवन होते. नेव्ही फायटर पायलट, टेस्ट पायलट आणि अंतराळवीर म्हणून त्यांनी अभिमानाने देशाची सेवा केली. त्याला शेकडो पुरस्कार आणि सन्मान मिळाले, परंतु सर्वच अवकाशाइतके कर्तृत्वापुढे दुय्यम ठरले. यादरम्यान त्यांची हृदयरोगाशी झुंज सुरु होती. हृदयविकाराचे प्रमाण वाढत गेल्यामुळे ७ ऑगस्ट २०१२ रोजी आर्मस्ट्राँग याच्यावर बायपास शस्त्रक्रिया झाली, तो झपाट्याने बरा होत असल्याचे सांगत होता, परंतु नंतर अचानक गुंतागुंत निर्माण झाली, त्याची प्रकृती अधिकच खालावली आणि वयाच्या ८२ व्या वर्षी २५ ऑगस्ट २०१२ रोजी सिनसिनाटी, ओहायो येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर, व्हाइट हाऊसने जारी केलेल्या संदेशात त्याचे वर्णन केवळ त्याच्या काळातीलच नव्हे तर सर्वकाळच्या महान अमेरिकन नायकांपैकी एक म्हणून केले गेले. आर्मस्ट्राँगला अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले, ज्यात प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडम, कॉन्ग्रेशनल स्पेस मेडल ऑफ ऑनर आणि काँग्रेसनल गोल्ड मेडल यांचा समावेश आहे. चंद्रावरील एक खड्डा आणि सौर मंडळामधील लघुग्रह त्याच्या नावावर आहेत. संपूर्ण अमेरिकेत त्याच्या नावावर डझनभर शाळा आणि उच्च शाळा आहेत आणि जगभरातील इतर देशांमध्ये त्याच्या नावावर शाळा, रस्ते आणि पुलांची नावे आहेत.

## 'जागरण गोंधळ' गाणं घेतंय प्रेक्षकांच्या मनाचा ठाव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जागरण गोंधळ ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. महाराष्ट्रीत विविध ठिकाणी भक्तिभावाने जागरण गोंधळ केला जातो. प्रत्येकाची यामागची श्रद्धा, भक्ती, नेहमीच आपल्याला पाहायला मिळते. बऱ्याचदा प्रथा म्हणूनही जागरण गोंधळ केला जातो. अशातच सध्या एका जागरण गोंधळाच्या गाण्याने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. 'आरपार' या सध्या चर्चेत असलेल्या सिनेमातील हे जागरण गोंधळ गाणं रसिकांच्या मनावर राज्य करत आहे. ललित प्रभाकरचा एक वेगळाच लूक या गाण्यातून समोर आला आहे ज्याने साऱ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. अर्थात, या गाण्यात ललितची एनर्जी वाखाणण्याजोगी आहे. 'आरपार' सिनेमातील या गाण्यात ललित तुटलेल्या हृदयाने देवीचा जागरण गोंधळ मांडताना दिसत आहे.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी ठाण्यात एल्डर्ली केअर सेवांचा शुभारंभ

**मुंबई : हॅलो प्रभात**




जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ठाणे येथील किम्स हॉस्पिटल्स आणि भारतातील आघाडीचे जेरियाट्रिक केअर ब्रँड इमोहा यांनी ठाणे क्षेत्रातील वृद्धांची काळजी घेण्याला प्रथम प्राधान्य देण्यासाठी महत्त्वपूर्ण सहयोगाची घोषणा केली. २०० ज्येष्ठ ठाणेकरांसाठी एल्डर्ली केअर सेवांचा शुभारंभ करण्यात आला. किम्स हॉस्पिटल्समध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत सुपर स्पेशालिटी कॅम्प सुरू झाल्यानंतर ते एकत्रितपणे सर्वांगीण केअर परिसंस्था तयार करत आहेत जी शारीरिकदृष्ट्या व भावनिकदृष्ट्या देखील ज्येष्ठांना आधार देते, प्रत्येक आई-बाबाला सुरक्षित, साह्य मिळत असल्याचे व काळजी घेतले जात असल्याचे वाटण्याची खात्री घेते.

## सणासुदीला पेटीएमवर ५१ रुपयांपासून डिजिटल सोने खरेदी करा

**मुंबई : हॅलो प्रभात**

सोनं हे पारंपरिकरित्या भारतीय घरांमध्ये बचतीचे आवडते साधन मानले जाते जे सणासुदीला खरेदी केले जाते आणि पिढ्यानपिढ्या पुढे दिले जाते. ओणम हा केरळमधील सर्वाधिक साजरा होणारा आणि उत्सुकतेने वाट पाहिला जाणारा सण आहे. तो सोनं खरेदी करण्यासाठी शुभ मानला जातो, जो समृद्धी, भरभराट आणि नव्या सुरुवातीचं प्रतीक आहे. या ओणमला कुटुंबं पेटीएमवर फक्त ५१ रुपयांपासून आपली डिजिटल सोन्याची बचत सुरू करू शकतात. सोनं विमा घेतलेल्या व ऑडिटेड व्हॉल्ट्समध्ये सुरक्षित ठेवले जाते, त्यामुळे भौतिक स्टोरेज किंवा लॉकरची गरज लागत नाही. भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह पेमेंट ॲप म्हणून पेटीएम गोल्ड शुद्धता, सुरक्षा आणि पारंपरिक सोनं खरेदीशी संबंधित लपलेल्या खर्चासारख्या चिंता दूर करते. हे २४के शुद्ध सोनं त्वरित खरेदीसाठी उपलब्ध करून देते.

# विलास बडे : सत्यशोधक पत्रकारितेचे प्रेरणास्थान

**दै.हॅलो प्रभात**

पत्रकारिता ही केवळ घटना मांडण्याची कला नसून समाजाला विचारप्रवृत्त करणारे, सत्याकडे नेणारे आणि जनतेच्या मनात सजगतेचे बीज रोवणारे एक महान कार्य आहे. महाराष्ट्राच्या पत्रकारितेत अशा अनेक तेजस्वी व्यक्तिमत्त्वांनी आपली छाप उमटवली आहे. त्यामध्ये लोकमतचे वरिष्ठ वृत्तनिवेदक व संपादकीय विभागाचे दिग्गज - विलास बडे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या लेखणीने सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्राला नवे भान दिले. बडे मुद्दे या लोकप्रिय स्तंभातून त्यांनी केवळ बातमी दिली नाही, तर समस्यांचा गाभा उलगडला, उपाय सुचवले आणि तरुण पिढीला योग्य दिशा दाखवली.

### जीवन परिचय : साधेपणातून महानतेकडे प्रवास

विलास बडे यांचा जन्म मराठवाड्यातील एका शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच अभ्यासू वृत्ती, समाजाभिमुख दृष्टिकोन आणि प्रश्नांची खोदून मांडणी करण्याची सवय त्यांच्या स्वभावात होती. शिक्षणकाळातच वाचन, लेखन, वक्तृत्व यामध्ये त्यांची वेगळी छाप पडू लागली. सत्य शोधण्याची ओढ व तळमळ यामुळे पत्रकारिता हीच आपली कर्मभूमी असावी असे त्यांना वाटले. पत्रकारितेच्या अभ्यासानंतर त्यांनी लोकमत या महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिकामध्ये प्रवेश केला. लोकमतच्या माध्यमातून बडे यांनी मराठवाड्यातील ग्रामीण प्रश्नांपासून राष्ट्रीय स्तरावरील राजकीय घडामोडीपर्यंत सर्व क्षेत्रांचा अभ्यासपूर्वक वेध घेतला.

### शैक्षणिक योगदान : तरुणांना विचार व दृष्टी देणारी पत्रकारिता

पत्रकारिता करताना बडे यांनी शिक्षणक्षेत्रातील उणिवा, धोरणातील विसंगती आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी सातत्याने मांडल्या.

ग्रामीण भागातील शाळांची दुरवस्था, शिक्षकांची कमतरता, अभ्यासक्रमातील काळानुरूप बदलाची गरज, उच्च शिक्षणातील असमानता या मुद्द्यांना त्यांनी अधोरेखित केले. त्यांच्या लेखांमुळे शासन व शिक्षण खात्याचे लक्ष वेधले गेले. शिक्षण हा समाज परिवर्तनाचा पाया आहे या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी नेहमी तरुणांना केवळ पदवी नव्हे, तर कौशल्याधारित शिक्षण घेण्याचे आवाहन केले.

### सामाजिक योगदान : जनतेच्या प्रश्नांचा आवाज

पत्रकारिता ही समाजाची आरशी असते. बडे यांनी आपली लेखणी जनतेच्या प्रश्नांसाठी अर्पण केली. शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, पाणीटंचाई, बेरोजगारी, आरोग्यसेवेतील त्रुटी, दलित-आदिवासींच्या समस्या -



या विषयांवर त्यांनी परिणामकारक लेखन केले. विशेष म्हणजे ते केवळ टीका करत बसले नाहीत, तर समस्येचे मुळ कारण शोधून उपाययोजना काय असू शकते? हे दाखवून दिले. त्यामुळे त्यांच्या लेखनाला धोरणकर्त्यांपासून सामान्य वाचकांपर्यंत सर्वत्र महत्त्व प्राप्त झाले.

### राजकीय पत्रकारिता वस्तुनिष्ठतेचा आदर्श

राजकीय क्षेत्रात बडे यांनी तटस्थ, वस्तुनिष्ठ आणि सत्यनिष्ठ पत्रकारिता केली. सत्ताधारी किंवा विरोधक - कुणाच्याही चुकीच्या धोरणांवर त्यांनी निर्भीड टीका केली.

बडे मुद्दे या त्यांच्या स्तंभातून त्यांनी राजकारणातील नाट्यमय घडामोडींना तथ्याधारित पद्धतीने मांडले. त्यांची खासियत म्हणजे - ते कधीच व्यक्तिनिष्ठ टीका करत नसत. व्यक्तीमागील धोरण, त्या धोरणाचा जनजीवनावर होणारा परिणाम आणि लोकशाहीतील त्याचे स्थान हे स्पष्ट करताना त्यांनी पत्रकारितेला दिशादर्शक आयाम दिला.

### बडे मुद्दे - लोकजागृतीचे व्यासपीठ

लोकमतमधील बडे मुद्दे हा त्यांचा लोकप्रिय स्तंभ महाराष्ट्रातील सर्व वाचकवर्गात चर्चेचा विषय ठरला. या स्तंभातून त्यांनी प्रत्येक आठवड्यात एखादा गंभीर सामाजिक किंवा राजकीय प्रश्न हाताळला. ङ्गबडे मुद्देङ्ग पहिल्यानंतर वाचकाला फक्त माहिती मिळायची नाही, तर चिंतनाची दारे उघडायची. शेतकऱ्यांचा बाजारभाव, ग्रामीण रस्त्यांची दुर्दशा, भ्रष्टाचार, बेरोजगारी, शिक्षणाची गुणवत्ता, प्रशासनातील पारदर्शकता हे सारे प्रश्न त्यांनी मुद्देसूद मांडले. त्यामुळे ङ्गबडे मुद्देङ्ग म्हणजे केवळ स्तंभ नसून जनतेचे व्यासपीठ ठरले.

### तरुण पिढीसाठी दिशा-दर्शन

आजच्या तरुण पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत नोकरीची अनिश्चितता, स्पर्धात्मक युगातील मानसिक ताण, डिजिटल माध्यमातील व्यसन, समाजातील नकारात्मकता. या सर्वांवर मात करण्यासाठी बडे यांचे मार्गदर्शन अनमोल आहे.

ते म्हणतात युवकांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता उद्योजकता स्वीकारावी.वाचन, विचार आणि विवेक या त्रिसूत्रीवर आधारित आयुष्य घडवावे. सामाजिक भान जपत आपल्या गाव-समाजासाठी कार्य केले, तर खरी प्रगती घडेल.त्यांच्या या विचारांतून तरुणाईला आशावादी आणि सकारात्मक दिशा मिळते.

### सामाजिक कार्यातील महत्वपूर्ण योगदान

पत्रकार असूनही बडे यांनी केवळ लेखणीपुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही. समाजातील उपेक्षित घटकांसाठी त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांना पाठिंबा दिला. शिक्षणासाठी निधी संकलन, शेतकरी मुलांच्या शिक्षणाला मदत, पत्रकार सहकाऱ्यांच्या अडचणीच्या वेळी मदतीचा हात अशा अनेक कार्यातून त्यांची समाजभानाची जाणीव प्रकर्षाने दिसते.

### पत्रकारितेतील आदर्शवत वैशिष्ट्ये

विलास बडे यांच्या पत्रकारितेतील काही वैशिष्ट्ये . सत्यनिष्ठा - कोणत्याही दडपणाला बळी न पडता सत्य मांडण्याची वृत्ती., वस्तुनिष्ठता व्यक्ती नव्हे तर मुद्दा हाच केंद्रबिंदू., जनाभिमुखता लेखनाचा केंद्रबिंदू सदैव सामान्य जनता., दूरदृष्टी समस्येचा भविष्यकाळातील परिणाम ओळखून उपाय सुचवणे., प्रेरणादायी शैली - तरुणांना सकारात्मकतेची दिशा देणारे लिखाण.

• प्रा.अजय बी.कोंगे
(एम.ए.एम.एड.,शिक्षण समुपदेशक)
विभाग प्रमुख : कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग,
संजय घोडावत इन्स्टिट्यूट, कोल्हापूर.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क :** ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

हॅलो प्रभात
सांगली-कोल्हापूर
जिल्हा विशेष ▪ सोमवार, २५ ऑगस्ट २०२५





# संमिश्र

## 'डॉल्बी' आवाज विरोधात विवेकानंदची जागरूक हाक



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरच्या भौतिकशास्त्र विभागाने डॉल्बीच्या आवाजाचे दुष्परिणाम जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अनोखा जनजागृती उपक्रम राबविला. शनिवार, २३ ऑगस्ट रोजी बिंदू चौक येथे सकाळी ९ ते ११ या वेळेत विद्यार्थ्यांनी पोस्टरच्या माध्यमातून मोहीम राबवली.या मोहिमेदरम्यान नागरिकांनी पोस्टरवरील माहिती वाचून सकारात्मक प्रतिसाद दिला. अनेकांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.उपक्रम ादरम्यान विभागप्रमुख डॉ. संजय लठ्ठे, डॉ. गणेश नवाथे, डॉ. सुमय्या इनामदार, प्रा. अविनाश गायकवाड, प्रा. अनुरथ गोरे, प्रा. प्रज्ञा पाटील, डॉ. कल्याणी खंडाळे, प्रा. मयुरी बराले,. गणेश माने, प्रशांत पाटील, पुंडलिक हरेर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे आणि प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन उपक्रमाला लाभले.

## दत्ताजीराव कदम लॉ कॉलेजमध्ये प्रवेशासाठी सुवर्णसंधी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित आणि अत्याधुनिक भौतिक तसेच मूलभूत सुविधांनी सुसज्ज असे दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी हे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू झाले आहे. सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया CET सेल मार्फत सुरू असून, B.. LL.B (५ वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम) : प्रवेश नोंदणी २१ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२५ दरम्यान LL.B (३ वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम) : प्रवेश नोंदणी २४ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२५ दरम्यान होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही किंवा ज्यांना पसंतीनुसार महाविद्यालय मिळालेले नाही, अशा विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयात विशेष नोंदणी केंद्र व विद्यार्थी सेवा केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. उएढ दिलेल्या आणि प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्वांनी वरील कालावधीत महाविद्यालयात भेट द्यावी, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.चंद्राणी बागडी यांनी केले आहे.

## रुपेश उदाळे यांचा रेल्वे विभागाकडून गौरव



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पन्हाळा तालुक्यातील उदाळवाडी गावचे सुपुत्र रुपेश उदाळे यांनी भारत सरकारच्या रेल्वे विभागात सलग तिसऱ्या वर्षी उत्कृष्ट कामगिरीचा मान मिळवला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल नुकताच प्रधान मुख्य विद्युत अभियंता यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.रुपेश हे सध्या मुंबई येथे रेल्वे विभागात कार्यरत असून त्यांच्या यशामागे रेल्वे खात्यातील वरिष्ठांचे तसेच गुजरात येथे वास्तव्यास असलेल्या आई-वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील सुपुत्राने राष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करत सलग तीन वर्षे मिळवलेला हा सन्मान पन्हाळा तालुक्यासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे. गावकऱ्यांसह तालुक्यातील विविध स्तरांतून रुपेश यांच्या यशाचे कौतुक होत आहे.

## अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानची सर्वसाधारण सभा संपन्न



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सामाजिक विकास प्रतिष्ठान या प्रतिष्ठानची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या डॉ.अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुलात डॉ.अण्णासाहेब डांगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून सभेस सुरुवात झाली. प्रथम श्रद्धांजली ठरावाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर विषय पत्रिकेतील विषयावर सविस्तर चर्चा होऊन सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष चिमण डांगे, मल्हार सेनेची सरसेनापती बबनराव रानगे, प्रतिष्ठानचे संचालक सुनील मलगुंडे, सभासद अविनाश खरात, छगनराव नांगरे, डॉ. आप्पासाहेब पुजारी,विठ्ठलराव मुसाई, प्रकाश कनप,सुनील शिणगारे आदी सभासद उपस्थित होते.

# अल्प कालावधीत मामाश्री पतसंस्थेची प्रचंड मोठी वाढ

**बाबाराजे देशमुख**
**नातेपुते : हॅलो प्रभात**

नातेपुते शहरात अनेक पतसंस्था निर्माण झाल्या पतसंस्था चालवणे अवघड आहे अत्यंत कमी कालावधीत मामाश्री पतसंस्थेमध्ये ठेवींच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. कर्ज वाटप करताना योग्य ती खबरदारी घेतल्याने पतसंस्थेचा एनपीए शून्य टक्के वर आहे संस्थेचे संचालक मंडळ चांगले असल्याने अल्प कालावधीत मामाश्री प्रथम संस्थेची प्रचंड मोठी वाढ झाली असल्याचे मत सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांनी व्यक्त केले.ते नातेपुते येथील मामाश्री ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते. सभेसाठी माझी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी आ.अँड. रामहरी रुपनवर, सोलापूर




जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, धुळदेव पतसंस्थेचे चेअरमन अँड. डी. एन. काळे, अहिल्यादेवी पतसंस्थेचे चेअरमन रघुनाथ ( अण्णा ) कवितके, समता परिवाराचे अँड .बी. वाय राऊत, मामाश्री पतसंस्थेचे चेअरमन तथा अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, नगराध्यक्षा अनिता लांडगे, माजी उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख ,नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बाहुबली चंकेश्वरा, शिवप्रसाद को-ऑपरेटिव्हच्या चेअरमन ऋतुजा मोरे, लक्ष्मी कृष्ण पतसंस्थेचे चेअरमन माऊली पाटील हर हर महादेव पतसंस्थेचे चेअरमन वामन पलंगे, सह्याद्री पतसंस्थेचे चेअरमन रणवीर देशमुख, बळीराजा पतसंस्थेचे चेअरमन संतोष काळे तसेच नगरपंचायतीचे नगरसेवक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. पतसंस्थेचे अहवाल वाचन रोहित झेंडे यांनी केले असून प्रास्ताविक संचालक अँड. रावसाहेब पांढरे यांनी केले तर आभार संचालक मोहित जाधव यांनी मानले.

## गगनबावड्यात अडकलेल्या पर्यटकांना जिल्हाधिकाऱ्यांच्या तत्परतेने दिलासा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

तेलंगणा राज्यातील ३५ पर्यटक २० ऑगस्ट रोजी गगनबावड्यावर फिरण्यासाठी आले असता पुरस्थितीमुळे कोल्हापूर मार्ग बंद झाल्याने अडकले. आर्थिक तसेच भाषेची अडचण निर्माण झाल्याने परिस्थिती गंभीर झाली होती. हा संदेश तेलंगणातील लोकप्रतिनिधीमार्फत मुख्यमंत्री कार्यालय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पोहोचताच जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी तातडीने मदतीचे आदेश दिले. त्यानुसार



गगनबावडा तहसीलदार श्री.गोरे यांनी पर्यटकांसाठी चहा-नाश्ता व जेवणाची व्यवस्था केली. पर्यायी राधानगरी मार्गाने कोल्हापूरकडे वळवताना रात्री बस बंद पडल्याने तलाठी उमेश कांबळे व राजू कोरे यांनी येळवडे (ता.राधानगरी) येथे सर्वांसाठी रात्रीचे जेवण व निवासाची सोय केली. तहसीलदार राधानगरी श्रीमती अनिता देशमुख यांनी देखील आवश्यक सुविधा दिल्या.

पुढील दिवशी सकाळी खासगी बसद्वारे पर्यटकांना कोल्हापूर येथे आणण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री महालक्ष्मी यात्री निवास, मिरजकर तिकटी येथे राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली. यासाठी श्रीपुजक कु. ऐश्वर्या मुनिश्वर यांनी विशेष परिश्रम घेतले, तर यात्री निवासचे मालक आसिफ अत्तार यांनी ३५ पर्यटकांना विनामूल्य राहण्याची सोय करून कोल्हापूरचे दातृत्व जपले. या घटनेनंतर पर्यटक सुखरूप तेलंगणातील घरी पोहोचले असून त्यांनी कोल्हापूरकरांचे, जिल्हाधिकाऱ्यांचे व सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार म ानले. ही घटना कोल्हापूरकरांचे दातृत्व व प्रशासनाची तत्परता अधोरेखित करणारी ठरली आहे.

## विना डॉल्बीमुक्त गणेशोत्सव करणाऱ्यांचा झाडे देऊन गौरव



**कोतोली : हॅलो प्रभात**

उंड्री गावात यंदा गणेशोत्सव डॉल्बीमुक्त पद्धतीने साजरा करणाऱ्या गणेश मंडळांचा ग्रामपंचायतीतर्फे झाडे व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रंजना यादव होत्या. या वेळी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल निनाई देवी मंदिर जिर्णोद्धारासाठी देणगी देणाऱ्या ग्रामस्थांचा देखील सन्मान झाडे व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. दरम्यान, कोतोली-नांदगाव रोडवर पावसाळ्यात वारंवार पाणी साचून गावकऱ्यांच्या घरांमध्ये पाणी जात होते. या समस्येची दखल घेऊन विनयरावजी कोरे यांच्या पाठपुराव्यामुळे पीडब्ल्यूडीकडून तातडीने गटाराचे काम करण्यात आले. या सामाजिक कार्याबद्दल ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा देखील सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला उपसरपंच उज्वला कांबळे, माजी सरपंच शहाजी यादव, सदस्य शरद मोरे, विजय मोरे, अजित खोत, बाबासो पाटील, सुवर्णा यादव, कल्याणी पाटील, पोलीस पाटील शहाजी कुदळे, तंटामुक्त अध्यक्ष संदीप यादव, प्रताप पाटीलसह ग्रामपंचायतीचे कर्मचारी व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कोरे अभियांत्रिकीत 'डिजिटल फाऊंड्री' कार्यशाळेची सांगता

**वारणानगर : हॅलो प्रभात**

येथील तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी मधील मेकॅनिकल विभाग आणि एआयसीटीइ (वाणी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डिजिटल फाऊंड्री: आयओटी, रोबोटिक्स व ऑटोमेशन यांचे एकत्रीकरण या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे, अध्यक्ष डॉ. विनयरावजी कोरे व वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी



यांनी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हि नावीन्यपूर्ण कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल सर्व संयोजकांचे अभिनंदन केले. आणि हि कार्यशाळा एआयसीटीई ने प्रायोजित केली त्याबद्दल धन्यवाद दिले. तसेच विद्यार्थ्यांनी औद्यागिक वसाहती फिरण्यासाठी वेळ काढून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहनही यावेळी केले.

मयुरा ग्रुप चे कार्यकारी संचालक मा. रवी डोळ्ी यांनी कामगारांना बदलून त्याठिकाणी ऍटोमेशन वापरले जावे, अशा क्रांतीची अजून आपल्या येथे गरज नाही तर जेथे मानवी सुरक्षितता गरजेची आहे तेथे हे तंत्रज्ञान वापरले जावे असे सांगितले. या कार्यक्रमासाठी अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, विभाग प्रमुख डॉ. पी. व्ही. मुळीक, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. एम. एस. धुत्तरगाव, सहसमन्वयक डॉ. एस. व्ही. लिंगराजू आणि महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातून दीडशेहून अधिक विद्यार्थी, उद्योजक आणि प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कृष्णकुमार जोशी यांनी केले, आभार कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. मुकुंद धुत्तरगाव यांनी मानले.

## श्रीमंत रामराव महाराज डफळे यांचा इतिहास प्रेरणा देणारा : दिनराज वाघमारे

**जत : हॅलो प्रभात**

इतिहास हा भावी पिढीला चेतना व ऊर्जा देऊन प्रेरणादायी बनवत असतो. विद्यार्थ्यांनी इतिहासातून प्रेरणा घेऊन भविष्याततील समस्या सोडवायच्या असतात. श्रीमंत रामराव महाराज डफळे हे भविष्यदृष्टे राजे होते. त्यांनी १८८५ मध्ये हायस्कूल ची स्थापना करुन जत संस्थानात आधुनिकतेचा पाया रचला. शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य व प्रशासनामध्ये क्रांतिकारी निर्णय घेऊन जत संस्थानात बदल घडविले. दातृत्व हा त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव होता. त्यामुळे त्यांच्या जीवनातून व कार्यातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन पत्रकार दिनराज वाघमारे यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे श्रीमंत रामराव महाराज डफळे यांची पुण्यतिथी 'रामराव डे' म्हणून साजरी केली जाते. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील हे होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीमंत रामराव महाराज डफळे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी श्रीमंत रामराव महाराज डफळे यांच्या कार्याचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी समाजहितासाठी व राष्ट्रकार्यासाठी पुढे आले पाहिजे असे सांगून त्यांनी श्रीमंत रामराव महाराज डफळे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला.

प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत प्रा.कुमार इंगळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सतीशकुमार पडोळकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.विशाल गोडबोले यांनी मानले. कार्यक्रम ास विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सभासदांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही : सुनिल पाटील

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

बँकेच्या ठेवीमध्ये वाढ होत असून चालुवर्षी बँकेला १ कोटी ८ लाख रुपये निव्वळ नफा झाला आहे. कर्ज वसुलीसाठी बँकेने कठोर धोरण अवलंबले असून सभासदांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही, असा विश्वास सन्मती सहकारी बँकेचे चेअरमन सुनिल पाटील यांनी व्यक्त केला. बँकेच्या ३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.प्रारंभी संचालक चंद्रकांत पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. चेअरमन सुनील पाटील यांनी




बँकेच्या अहवाल सालातील कामकाजाचा आढावा मांडला. सीईओ अशोक पाटील यांनी सभेची नोटीस व विषय वाचन केल्यावर सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी सहकारी संस्था चालवणे दिवसेंदिवस अवघड बनत आहे. एकीकडे संस्थेची प्रगती होत असताना काहीवेळा जवळचेच संस्थेला अडचणीत आणण्यासाठी प्रयत्न करतात. अशावेळी संस्थेनेही खंबीरपणे आपली भूमिका मांडत जशास तसे उत्तर देणे गरजेचे असते. संस्थेच्या प्रगतीत अडथळा आणणाऱ्या सभासदांवर प्रसंगी कठोर कारवाईची भूमिका घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते सभासदांना भेटवस्तू वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. सभेस माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे, आमदार राहुल आवाडे, श्रीरंग खवरे, संजय चौगुले, राहुल खंजिरे, व्हा. चेअरमन एम.के. कांबळे, विश्वनाथ अग्रवाल, अहमद मुजावर, प्रकाश मोरे, प्रकाश सातपुते, सुभाष बलवान यांच्याह संचालक, सभासद उपस्थित होते .

## स्टेरिस हेल्थकेअरने पायाभूत सुविधांमध्ये केली वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबईतील आघाडीची औषध कंपनी, स्टेरिस हेल्थकेअरने आज राज्यात गोदामे, लॉजिस्टिक्स आणि वितरण क्षमतांचा विस्तार करून महाराष्ट्रात आपल्या कामकाजाचा महत्त्वपूर्ण विस्तार करण्याची घोषणा केली. हा उपक्रम स्टेरिस हेल्थकेअरची सुरुवात जिथून झाली त्या बाजारपेठेप्रती कंपनीची वचनबद्धता आणि महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात परवडण्याजोगे, नाविन्यपूर्ण आरोग्यसेवा उपाय प्रदान करण्याचा तिचा दृष्टिकोन अधोरेखित करतो.

# समूहगान स्पर्धेत विकास विद्यामंदिर तृतीय

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

समिधा प्रतिष्ठान आणि मां फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यम ाने गडकरी सभागृह, पेटाळा येथे झालेल्या राष्ट्रभक्तीपर आंतरशालेय समूहगान स्पर्धे त विकास विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींनी दमदार गायन सादर करून माध्यमिक गटात तृतीय क्रमांक मिळवला.या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक शाळांनी सहभाग नोंदवला होता. राष्ट्रभक्तीपर गीतांच्या सुरेल सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. त्यामध्ये विकास विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींनी ताल, सूर आणि भावना यांचा संगम साधत प्रेक्षकांची दाद मिळवली. त्यांच्या या यशाबद्दल आयोजकांकडून



सन्मानचिन्ह, रोख रक्कम आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट सादरीकरणासाठी मुख्याध्यापिका इंदिरा कांबळे, सहाय्यक शिक्षक तानाजी कवडे आणि विश्वजीत भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले. गायनाच्या तालमींपासून ते मंचावरील सादरीकरणापर्यंत विद्यार्थिनींना सातत्याने मार्गदर्शन मिळाले. पुरस्कार वितरण समारंभाला महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, संस्थेचे प्रा. नारायण निळपणकर सह म ान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या प्रतिभेचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

समूहगान स्पर्धेत मिळालेले हे यश विकास विद्यामंदिरसाठी अभिमानाचा क्षण ठरला असून विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासात भर घालणारे आहे.

# डॉ. संजय डी.पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा सन्मान

## नवभारत महाराष्ट्र फर्स्ट कॉन्क्लेव्हमध्ये केला गौरव




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

उच्चशिक्षण क्षेत्रात अतुलनीय योगदान देणाऱ्या आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांचा मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याहस्ते ङ्कमहाराष्ट्र गौरवङ्ख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ङ्कनवभारतङ्खतर्फे आयोजित महाराष्ट्र फर्स्ट कॉन्क्लेव्हमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील ताज प्रेसिडेंट येथे ङ्कमहाराष्ट्र फर्स्ट कॉन्क्लेव्हङ्ख आयोजित करण्यात आली होती. यावेळी 'नवभारत'चे व्यवस्थापकीय संचालक वैभव माहेश्वरी, डी. वाय. पाटील ग्रुपचे विश्वस्त ऋतुराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या परिषदेत संबोधित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र भारतात अग्रस्थानी आहे. मात्र, राज्यातील शिक्षण क्षेत्राचा अजूनही वेगवान विकास होणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणासाठी भारताबाहेर जाणारे विद्यार्थी राज्यातच शिकतील अशा प्रकारचे शिक्षण राज्यातच उपलब्ध यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर आमचा भर राहील. त्याचबरोबर पॉलिसी बेस्ट इंडस्ट्रीलायझेशन करण्यावरही सरकारचा भर राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.विविध क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण कल्पना राबवून त्या कृतीत उतरणारे व त्यायोगे राज्याच्या सर्वांगीण विकासात योगदान देणाऱ्या मान्यवरांना यावेळी ङ्कमहाराष्ट्र गौरवङ्ख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र आणि उच्च शिक्षणातील अतुलनीय योगदानाबद्दल डॉ. संजय डी. पाटील यांचा यावेळी विशेष पुरस्कार देऊन मंत्री प्रताप सरनाईक व मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर, डी. वाय. पाटील कृषी आणि तंत्र विद्यापीठ, तळसंदे (कोल्हापूर) आणि डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डी (पुणे) या तीन विद्यापीठांचे कुलपती आणि डी. वाय. पाटील समुहाचे अध्यक्ष म्हणून डॉ. संजय डी. पाटील कार्यरत आहेत.

डॉ. पाटील यांच्या नेतृत्वाखाली के.जी. ते पी.जी. पर्यंत शिक्षण देणाऱ्या ४८ संस्था ज्ञानदानाचे काम करत आहेत. या संस्थांमध्ये ४३ हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. समूहाच्या विविध संस्थांमार्फत मेडिकल, अभियांत्रिकी, आर्कीटेक्चर, पॉलिटेक्निक, नर्सिंग, फार्मसी, कृषी, कृषी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, हेल्थ सायन्स, हॉस्पिटलिटी अशा विविध क्षेत्रात उच्च शिक्षण दिले जाते. शिक्षित पिढी घडवून राज्याच्या विकासात दिलेल्या असीम योगदानाबद्दल डॉ. संजय डी. पाटील यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला.




## प्रवीण लुंकड यांना 'लाईफ टाईम अचिव्हमेंट' पुरस्कार

**कुपवाड : हॅलो प्रभात**

येथील सुरज फाउंडेशनचे अध्यक्ष व उद्योजक प्रवीण लुंकड यांना राष्ट्रीय फीड आणि पशुधन संघटने कडून लाईफ टाईम अचिव्हमेंट अवॉर्ड हा मानाचा पुरस्कार २२ ऑगस्ट २०२५ रोजी हैदराबाद येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार भारत सरकारचे सन्माननीय पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय मंत्री श्री.बघेला यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

गेल्या ४७ वर्षांपासून पशुधन उद्योगाच्या विकासासाठी प्रवीण लुंकड यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान त्यांना बहाल करण्यात आला आहे.

या विशेष प्रसंगी प्रवीण लुंकड यांनी सांगितले की, हा पुरस्कार मिळणे म्हणजे माझ्या संपूर्ण कार्याचा गौरव आहे. या प्रवासात मला साथ देणाऱ्या उद्योग क्षेत्रातील मित्रमंडळींना, सहकाऱ्यांना, शुभचिंतकांना आणि माझ्या कुटुंबीयांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

## क्षारपड मुक्तीच्या 'श्री दत्त पॅटर्न'ची यशोगाथा चर्चासत्र संपन्न

### गणपतराव पाटील यांचे अनुभव ठरले अधिकाऱ्यांना मोलाचे



**शिरोळ : हॅलो प्रभात**

भारतीय कृषी अनुसंधान संस्था दिल्ली व राष्ट्रीय मृदा लवणता अनुसंधान संस्था कर्नाल, हरियाणा यांच्या संयुक्त विद्यमाने कर्नाल येथे पाच दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी श्री दत्त सहकारी साखर कारखान्याच्या वतीने राबविण्यात आलेल्या जमीन क्षारपड मुक्त दत्त पॅटर्न ची माहिती व अनुभव सांगण्यासाठी उद्यानपंडित गणपतराव पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये गणपतराव पाटील यांनी श्री दत्त पॅटर्नचे जमीन क्षारपडमुक्तीसाठीचे फायदे, त्याची यशोगाथा सांगून राष्ट्रीय कृषी विकास योजनेमार्फत मिळालेल्या अनुदाना संदर्भातही सविस्तर माहिती दिली. जलसंपदा अधिकाऱ्यांना गणपतराव पाटील यांचे अनुभव मोलाचे ठरले.

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागामार्फत राज्यांमध्ये जमीन क्षारपड मुक्तीच्या संदर्भात काम केले जाणार आहे. यामध्ये शासनाचे ८० टक्के आणि शेतकऱ्यांची २० टक्के रक्कम या आधारावर होणारे काम, याची माहिती अधिकारी, इंजिनियर यांना व्हावी यासाठी पाच दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गणपतराव पाटील हे प्रमुख मार्गदर्शक होते.

श्री दत्त पॅटर्न मध्ये पाणस्थळ आणि क्षारपड जमिनीमध्ये सुमारे दहा हजार एकरामध्ये सच्छिद्र पाईपलाईन निचरा प्रणालीच्या माध्यमातून केलेले यशस्वीरित्या काम आणि सुमारे चार हजार एकरावरती पिकांचे येत असलेले उत्पादन, जमीन क्षारपड मुक्तीसाठी गावांमधील शेतकरी एकत्रित येऊन संस्था स्थापन करून केलेल्या कामाचे यश, त्याचे फायदे, राष्ट्रीय कृषी विकास योजनेमार्फत ११ कोटी ४६ लाखांचे अनुदान मिळवण्यासाठी शासन दरबारी केलेले प्रयत्न, आगामी काळात क्षारपड मुक्तीचे काम झाल्यास वापरात येणाऱ्या जमिनीमुळे होणारा आर्थिक आणि पर्यावरणीय फायदा, दत्त पॅटर्नच्या पद्धतीची उपयोगितता आणि यामध्ये येणाऱ्या अडचणी आणि त्यावर कशा पद्धतीने मात करता येते, सेंद्रिय कर्ब वाढीसाठीचे झालेले प्रयत्न, अशा विविध बाबींवर आपल्या अनुभवाच्या आधारे गणपतराव पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी क्षारपडमुक्तीच्या कामाचा एक विस्तृत आढावा घेऊन सविस्तर माहिती दिली. यावेळी राष्ट्रीय मृदा लवणता अनुसंधान संस्था कर्नाल, हरियाणाचे डायरेक्टर डॉ. आर. के. यादव, डॉ. बुंदेला यांच्यासह दत्त कारखान्याचे संचालक इंद्रजीत पाटील, कीर्तीवर्धन मरजे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अमरापूर येथे आठवडी बाजारास सुरुवात



**कडेगांव : हॅलो प्रभात**

अमरापूर (ता. कडेगाव) येथे विशेष मासिक ग्रामसभेच्या निर्णयानुसार शनिवारी लोकनियुक्त सरपंचा सौ. सुनिता प्रकाश गडळे यांच्या शुभहस्ते या बाजाराचे उद्घाटन करण्यात आले. टेंभूच्या पाण्याने अमरापूर सह लगतचा परिसर पानस्थळ झाल्यामुळे अनेक छोट मोठे शेतकरी विविध प्रकारचे फळभाज्या, पालेभाज्यांचे उत्पादन घेत असतात त्या शेतक-यांचा माल शेतातून थेट ग्राहकांना उपलब्ध व्हावा यासाठी विशेष मासिक ग्रामसभेत शनिवार हा आठवडा बाजार सुरुवात करण्याचा निर्णय एक मताने मंजूर झाला होता. या बाजारामुळे अमरापूर सह आसपासच्या गावातील ग्रामस्थांचा व शेतकऱ्यांचा पैसा व वेळ वाचणार असून , सरपंचा सौ. सुनिता प्रकाश गडळे यांनी अनेक शेतकरी ग्रामस्थ यांना या बाजाराचा लाभ घेण्याच्या आव्हान यावेळी केले.

यावेळी उपसरपंच बालाजी पवार ग्राम.पं. सदस्य ईश्वर मोरे, मच्छिंद्र मोरे,महादेव रुपनर,राहुल शिंदे,संतोष आंबवडे, संतोष शिंगटे, जगन्नाथ मोरे, सचिन देशमुख, व खरेदी विक्री संघाचे संचालक शरद मोरे, माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश गढळे, सुभाष मोरे, शंकर मोरे , दिनकर मोरे, मोहन पवार, आनंदराव मोरे, सचिन रुपनर, सुरेश मोरे, नानासो जाधव सर्जेराव रुपनर, अनिल गढळे, भानुदास काकडे, अधिकराव मोरे, फिरोज मुल्ला ,विलास मोरे रमेश रुपनर ,मानसिंग वायदंडे, हनुमंत रुपनर ,संजय मोरे, नामदेव मोरे, हनमत वीर, विनोद मोरे, चंद्रकांत मोरे सावकर, बाबासो रुपनर, नारायण मोरे, ईश्वर सुतार, दत्तात्रय जरग, राजू रुपनर, सत्यवान रुपनर, महादेव मोरे, शिवाजी रुपनर, यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बोरगाव ग्रामपंचायतीतर्फे स्वच्छता मोहीम सुरू

**बोरगाव : हॅलो प्रभात**

कृष्णा नदीला आलेल्या पुराचे पाणी पात्रांमध्ये परतू लागले आहे. नदी काठावरील घरात व परिसरात चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अनेकांना घरी जाता येत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

महापुरामुळे बोरगाव ता. वाळवा येथील मारुती मंदिर परिसर, ज्योतिबा मंदिर परिसर, राजाराम बापू उद्यान परिसर त्याच बरोबर अनेक ठिकाणी नदीतून आलेल्या पाण्याच्या फुगीमुळे अनेक घरे पाण्याखाली गेली होती सध्या पुराचे पाणी ओसरले आहे मात्र नदीतून आलेल्या गाळ साचला आहे. दरम्यान बोरगाव ग्रामपंचायतीने जेसीबी व कमचाऱ्यांच्या साह्याने साफसफाई सुरू केली आहे. सर्व रस्ते व परिसरात खुले करण्यासाठी गतीने स्वच्छता केली जात आहे. यासाठी लोकनियुक्त सरपंच जितेंद्र पाटील, उपसरपंच राजेंद्र वाटेगावकर, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी आर बी रजपूत यांच्यासह सर्व ग्रामपंचायत कर्मचारी काम करीत आहेत.

## येळापूर तंटामुक्त अध्यक्ष पदी विजय पाटील

**शिराळा : हॅलो प्रभात**

ग्रामपंचायत अधिकारी सतीश पाटील यांच्या प्रयत्नमुळे येळापुर (ता. शिराळा ) गावचा तंटा मिटला असून तंटामुक्त समितीच्या अध्यक्ष पदी विजय दादू पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.गेल्या वर्षा पासुन हे पद रिक्त होते.तंटामुक्त अध्यक्ष निवडी वेळी ग्रामसभे मध्ये दोन गटात भांडण, वादावादी आणि एकमेकांच्या अंगावर धावणे असे प्रकार घडत असल्याने निवड प्रक्रिया लांबणीवर टाकली होती.



ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभेचे आयोजन केले होते.यात पुन्हा अध्यक्ष निवडीचा टाकला होता. त्यामुळे गेल्या आठ दिवसापासून जोडऱ्या सुरु झाल्या होत्या. ग्रामपंचायतीने कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त मागितला होता.पंचायत समितीने मतदान झाल्यास अन्य पाच कर्मचारी यांची नियुक्ति केली होती. मात्र गेल्या आठ दिवसात ग्रामपंचायत अधिकारी सतीश पाटील यांनी सर्व पक्षीय प्रमुख कार्यकर्ते यांच्याशी संपर्क करत बिनविरोध निवडीसाठी आव्हान केले होते.त्याला सर्वानी प्रतिसाद दिला.गुरुवारी झालेल्या बैठकित विजय पाटील यांच्या नावावर एकमत झाल्याने शुक्रवारी झालेल्या ग्रामसभेत त्यांची बिनबिरोध निवड करण्यात आली.यावेळी सरपंच डॉ. तानाजी पाटील, उपसरपंच सौ. प्रतिभा पाटील, पांडुरंग गायकवाड,किसन आटूगड़े,प्रकाश मकामले, शंकर पाटील, संजय नांगरे, शिवाजी लाड,ग्रामसेवक सतीश पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.




## जि.प.शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**देवराष्टे : हॅलो प्रभात**

कडेगाव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील जिल्हा परिषद शाळा दि.१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शाळेतील विविध परीक्षांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद शाळा चिंचणी येथे केंद्रप्रमुख गोपाळराव होनमाने यांच्या हस्ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नवज्योत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिंचणी यांच्यावतीने स्वर्गीय. द्वारकाबाई नामदेव माळी यांच्या स्मरणार्थ त्यांची सुपुत्र भरत माळी सर (वरिष्ठ लेखा सहाय्यक समग्र शिक्षा पंचायत समिती कडेगाव) यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा चिंचणी येथील विविध स्पर्धा परीक्षा गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रोख रक्कम बक्षीस व वृक्षारोपणासाठी एक पेरूचे रोप देऊन सत्कार करण्यात आले. तसेच कै. सुधाकर हरिबा माने गुरुजी यांच्या स्मृती पित्यर्थ विकास सुधाकर माने यांनी शाळेतील दोन गरीब ,होतकरू व अभ्यासू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग ,कंपास पेटी व सर्व लेखन साहित्य दिले.

यावेळी चिंचणी केंद्रप्रमुख गोपाळराव होनमाने , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक उत्तम मदने व सर्व शिक्षक बंधू भगिनी तसेच पालकांच्या उपस्थितीत गुणवान विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षिका, अंगणवाडी सेविका मदतनीस व पालक उपस्थित होते.

## प्रामाणिक प्रयत्नच ध्येयापर्यंत पोहोचवितात : प्रा. डॉ. राशिनकर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केल्यास त्याला ते यशापर्यंत पोहोचवितात असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक व बौद्धिक संपदा हक्क कक्षाचे संचालक प्रा.डॉ. गजानन राशिनकर यांनी केले. येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयाच्या पदव्युत्तर समन्वय समितीच्यावतीने आयोजित केलेल्या एकदिवसीय नेटसेट मार्गदर्शन कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. याप्रसंगी उदघाटक व प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. जयवंत चौधरी, शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. दत्तप्रसाद पोरे, उपप्राचार्य प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. राशिनकर पुढे म्हणाले, नेट किंवा सेट ह्या परीक्षा अत्यंत सोप्या असून विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन केल्यास त्यांना यश प्राप्त करता येते. आपण ज्या विषयाची परीक्षा देणार असतो त्या विषयाचा आवाका मोठा असल्याने पेपर क्रमांक एकची अधिक चांगली तयारी केल्यास पास होण्याची अधिक संधी असते. स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना अभ्यासाबरोबरच युक्त्या प्रयुक्त्यांचा अधिक वापर करावा. आपल्याकडे जिद्द असेल तर आपण चिकाटीने व मेहनतीने स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो. यावेळी त्यांनी नेट सेट पेपर क्रमांक एकच्या नोट्स विद्यार्थ्यांना मोफत दिल्या.

उद्घाटनपर भाषण करताना डॉ.चौधरी म्हणाले, प्राध्यापक होण्यासाठी नेट किंवा सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असून परिश्रमाने व योग्य नियोजनाने ही परीक्षा पास होता येते. मुलाखत देताना विषयाच्या ज्ञानाबरोबर सामान्य ज्ञान ही आवश्यक असते. शासनाच्या बदलत्या धोरणानुसार आपली शैक्षणिक पात्रता सिद्ध करणे गरजेचे आहे. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे यांनी डॉ.राशिनकर यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यशाला कोणताही शॉर्टकट नसून अधिक मेहनत करून यश संपादन केले पाहिजे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. संदीप पातुगडे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. (डॉ.) ज्ञानदेव झांबरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन श्रीमती रेश्माबानो मुलांनी व श्रीमती सुमती कांबळे यांनी केले तर आभार डॉ.राजेश गावित यांनी मांडले.

प्रथम सत्राचे मार्गदर्शक डॉ राशीनकर यांनी प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना अनेक संकल्पना स्पष्ट करून सांगितल्या. प्रा.(डॉ.) चंद्रकांत कांबळे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले तर आभार डॉ.संदीप वाटेगावकर यांनी मानले. या प्रसंगी प्रा.डॉ. दत्तप्रसाद पोरे (रसायनशास्त्र), डॉ.संजय कुमार सरगडे (मराठी), डॉ.सिराज शेख (हिंदी), डॉ. सारंगपानी शिंदे (इंग्रजी), डॉ. नेताजी दबडे (वाणिज्य), प्रा.मनीषा पवार (अर्थशास्त्र) यांनी मार्गदर्शन केले.

## धनंजय कोळेकर यांचा विराज नाईक यांच्या हस्ते सत्कार

**शिराळा : हॅलो प्रभात**

येथील धनंजय दिगंबर कोळेकर यांची आयडीबीआय बँकेत साहाय्यक व्यवस्थापकपदी निवड झाल्याबद्दल विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक यांनी त्यास पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विशाल लोहार, अक्षय सुतार, पंकज हवालदार, अक्षय कोळेकर, राजू सुतार, राज पाटील, महेश पाटील, धनाजी चव्हाण, रोहित नाईक, अमोल कांबळे, सर्जेराव गोसावी, प्रदीप महामुनी, अमित पाटील, तुषार यादव, ऋतुराज जाधव आदी उपस्थित होते.



हॅलो प्रभात
अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ सोमवार, २५ ऑगस्ट २०२५





# श्रावण समाप्ती निमित्त महाआरती सोहळा संपन्न

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

श्रावण मास समाप्तीनिमित्त निवारा परिसरातील काशी विश्वेश्वर महादेव मंदिरात व श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग येथून आणलेल्या भगवान शंकराच्या मूर्ती व महादेव पिंडीचा महाआरती सोहळा तसेच पिंडीस भात लेपन सोहळा उत्साहात पार पडला. हा धार्मिक सोहळा राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती रमेशगिरी महाराज, कुंभारी येथील श्रीक्षेत्र राघवेश्वर देवस्थानचे मठाधिपती श्री श्री १०८ महंत राजेश्वरानंदगिरी महाराज, साध्वी शारदानंदगिरी, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज सुरासे, निवारा हाऊसिंग सोसायटीचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन निवारा भजनी मंडळ अध्यक्षा सौ. सुहासिनी ओमप्रकाश कोयटे



यांच्या मार्गदर्शनाखाली तर साई निवारा मित्र मंडळ अध्यक्ष जनार्दन कदम यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. निवारा परिसरातील महादेव मंदिरात पिंडीला भात लेपन हा धार्मिक विधी गेल्या १५ वर्षांपासून कोयटे परिवाराकडून सातत्याने होत आहे. या मंदिरात शंकर पिंडीची प्राणप्रतिष्ठा सुमारे ४० वर्षांपूर्वी काशीबाई दादाप्पा कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली होती. तसेच कार्तिक महिन्यात येथे काकड आरती उत्सवही ह.भ.प. बाबासाहेब कापे व हौशीराम बर्गे यांच्या म ार्गदर्शनाखाली मोठ्या जल्लोषात पार पडतो. श्रावण समाप्ती महाआरती प्रसंगी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत-महंतांचे पूजन संदीप ओमप्रकाश कोयटे, सौ.स्वाती कोयटे व जनार्दन कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बाबासाहेब जंगम, माजी नगरसेविका दीपाताई गिरमे, बापूसाहेब इनामके, प्रदीप साखरे, रामोशेठ पटेल, राजेंद्र नानकर, चांगदेव शिरोडे, सुरेंद्र व्यास, विष्णुपंत गायकवाड, लक्ष्मीनारायण भट्टड, डॉ.नरेंद्र भट्टड आदींसह परिसरातील शिवभक्त परिवारासह उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार अनंत बर्गे यांनी मानले.

# कुस्ती स्पर्धेत पै.वेदिका सासणेला रौप्य पदक



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

झारखंड मध्ये रांची येथे राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा नुकत्याच पार पडल्या पोर्ले तर्फ ठाणे येथील पैलवान वेदिका हंबीरराव सासणे यांनी २३ वर्षे वयोगटामध्ये महिला विभागात द्वितीय क्रमांकाचे विजेतेपद मिळवले आहे. महाराष्ट्र महिला संघाने या स्पर्धेमध्ये २ सुवर्ण २ रौप्य व ४ कास्य पद मिळवली आहेत. या स्पर्धेत पैलवान वेदिका सासणे या रौप्य पदाची मानकरी ठरली आहे. पैलवान सासणे यांना कोच म्हणून पैलवान शैला धुमाळ यांचे मार्गदर्शन लाभले. पैलवान वेदिकाचा आसुर्ले पोर्ले परिसरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# सोमैया महाविद्यालयात 'आयबीपीएस'कार्यशाळा संपन्न



**कोपरगांव : हॅलो प्रभात**

विविध सरकारी नोकऱ्या मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी तत्पर असावे. सरकारी नोकरी मिळवण्यासाठी आयबीपीएस एक्झाम सारखी दुसरी सोपी व पारदर्शक पद्धती नाही. अभ्यासातील सातत्य व योग्य मार्गदर्शन हे आयबीपीएस परीक्षा उत्तीर्ण होण्याचे अचूक समीकरण आहे. मैदानावर शारीरिक कसरत व मोबाईलचा योग्य व कमी वापर हे तुमच्या यशाचे गमक ठरू शकते. असे प्रतिपादन संभाजीनगर येथील सारथी एज्यूकेशनचे संचालक मा. अक्षय चोळके यांनी येथे केले. स्थानिक के. जे. सोमैया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कोपरगावच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, वाणिज्य शाखा, विद्यार्थी मार्गदर्शन योजना व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने आयबीपीएस बँकिंग कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

त्या वेळी ते बोलत होते. यशस्वरित्या संपन्न झाली. संजित कदम यांनीही विद्यार्थ्यांना बँकिंग परीक्षेतील विविध बारकावे सोप्या पद्धतीने समजावून सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रो.(डॉ) वसुदेव साळुंके यांनी केले तर सूत्रसंचालन विद्यार्थी मार्गदर्शन योजनेचे समन्वयक डॉ.रवींद्र जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. विजय सोमासे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सचिन जाधव प्रा. गुडघे, प्रा जगधने प्रा. आढाव मॅडम के कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी. प्रा. जगधने, प्रा प्रवीण गुडघे प्रा. सचिन जाधव, प्रा. धनवटे, प्रा. माळी प्रा. सोनवणे मयुरी आवारे प्रा. मानसी चव्हाण प्रा. श्रावणी आढाव व महाविद्यालयाचे रजिस्टर डॉ. अभिजीत नाईकवाडे यांनी विशेष प्रयत्न केले.

# हातवळणची कन्या ज्ञानेश्वरी फडके इस्त्रो भेटीला

**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हातवळण येथील विद्यार्थिनी कु.ज्ञानेश्वरी मंगेश फडके हिची भारताच्या प्रतिष्ठित इस्त्रो (ISRO) संस्थेच्या सहलीसाठी निवड झाली आहे. ही संपूर्ण दौंड तालुका,हातवळण गावासाठी, व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हातवळणसाठी अभिमानास्पद बाब आहे .जिल्हा परिषद शिक्षण विभाग पुणे यांच्या वतीने आयोजित



नासा व इस्त्रो भेटीच्या परीक्षेम ध्ये सहभागी होणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांमधून पुणे जिल्ह्यातून पन्नास विद्यार्थी निवडले गेले आणि त्यामध्ये कु.ज्ञानेश्वरी मंगेश फडके हिची निवड झाली आहे. तिची बुद्धिमत्ता चिकाटी आणि मेहनतीला ही तिला मिळालेली पावती आहे .उपस्थित सरपंच रमेश जगताप, मंगेश फडके,अनिल गवळी, चैताली फडके, पोलीस पाटील संजय म्हेत्रे, ग्रामसेविका प्रज्ञा चव्हाण यांनी ग्रामसभेत सत्कार करून पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा दिल्या.तसेच जिल्हा परिषद शाळा हातवळण वतीने शाळेतील मुख्याध्यापक छाया पगारे, रावसाहेब घोरपडे, शितल गदादे दिलीप साळुंके, महादेव भालेराव, छाया साळुंके शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद गांधले, व सर्व सदस्य समिती. वरवंड केंद्रप्रमुख मनीषा दुर्गे, विस्तार अधिकारी तांबोळी मॅडम, पंचायत समिती दौंड तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी

संजय महाजन साहेब यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'टू सप्लाय सुपर स्टॉकीस्ट'चे उद्घाटन उत्साहात संपन्न



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

यड्राव येथे अभिजीत नाईकवाडे, शुभम काजवे व ओंकार भोंगे या तरुण उद्योजकांनी सुरू केलेल्या 'टू सप्लाय सुपर स्टॉकीस्ट' या नवीन फर्मचे उद्घाटन आ.डॉ.राहुल आवाडे यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले.या प्रसंगी मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली असून, सर्वांनीच या उपक्रमाचे कौतुक केले. तरुणाईने व्यवसायाच्या माध्यमातून समाजात नवनवीन संधी निर्माण करून स्वावलंबनाचा मार्ग निवडावा, हा उदात्त हेतू या फर्मच्या स्थापनेतून दिसून येतो. आमदार डॉ. राहुल आवाडे साहेब यांनी या नवीन व्यावसायिक उपक्रमासाठी संस्थापकांना शुभेच्छा दिल्या व उज्ज्वल यशाची कामना व्यक्त केली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवर व पाहुण्यांनी उद्योजकांना प्रोत्साहनपर शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सहकार्याचे आश्वासन दिले.

# राहुरी व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी स्वप्निल कासार

## उपाध्यक्षपदी सिद्धार्थ रासने

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी शहर स्टेशनरी ,जनरल, कॉस्टेमिक व झेरॉक्स असोसिएशनच्या अध्यक्ष पदी स्वप्नील कासार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे मावळते अध्यक्ष अनिल भट्टड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मीटिंगमध्ये सचिव आप्पासाहेब सरोदे यांनी गेल्या ५ वर्षातील विविध उपक्रमांची माहिती दिली व कोषाध्यक्ष युवराज चव्हाण यांनी आर्थिक ताळेबंदाचा हिशोब मांडला.यावेळी जुन्या कार्यकारिणीचा कार्यकाल



संपुष्टात आल्याने नव्या कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. असोसिएशनच्या अध्यक्षपदी स्वप्निलशेठ कासार तर उपाध्यक्षपदी सिद्धार्थ रासने,सचिवपदी अप्पासाहेब सरोदे, खजिनदारपदी युवराज चव्हाण संपर्कप्रमुख मधुकरभाऊ घाडगे यांची निवड करण्यात आली.

यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष स्वप्निल कासार म्हणाले की सर्वांनी एकमताने माझी निवड केल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. यापुढील काळात असोसिएशनच्या सर्व सभासदांचे हित लक्षात घेऊन सर्वांना सोबत घेऊन अनेक विधेयक कामे आपण करू या. असोसिएशनच्या माध्यमातून व्यापारी बांधवांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्याचा संकल्प आहे. या बैठकीत नवनिर्वाचित कार्यकारणीचे सर्व व्यापारी बांधवांकडून अभिनंदन करण्यात आले तर आभार संपर्कप्रमुख मधुकर घाडगे यांनी केले. यावेळी व्यापारी बांधव उपस्थित होते

# ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग विषयावर ट्रेनिंग संपन्न



**पुणे : हॅलो प्रभात**

येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयाच्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग व गिरी टेक हब प्रा.ली. यांचे संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी 'ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग' या विषयावर ३२ तासांचा विद्यार्थी विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या ट्रेनिंग मध्ये विद्यार्थ्यांना मोफत हँड्स-ऑन ट्रेनिंग देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना जावा प्रोग्रामिंगचे बेसिक ते ॲडव्हान्स कॉन्सेप्ट्स, ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंगचे सिद्धांत, तसेच रिअल-टाईम कोडिंग अनुभव यांची सखोल माहिती देण्यात आली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा विकास करण्यासोबतच प्लेसमेंटसाठी तयारी करण्यासाठी उपयुक्त ठरला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ.अमित कदम यांनी आयोजित केला. तर प्रा. प्राजक्ता खैरे व प्रा. राजश्री निकम यांनी हा कार्यक्रम उत्कृष्टरीत्या समन्वयित केला.या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एस. बी. ठाकरे, डॉ.अमित कदम , समन्वयक प्रा. प्राजक्ता खैरे व प्रा.राजश्री निकम सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाने या ट्रेनिंग सत्राचे आयोजन केल्या बद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस सौ.प्रमिला गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# उत्तम उत्तुरे फौंडेशनचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर शहर व जिल्ह्यातील घरगुती गणेशोत्सवांमध्ये उत्तम सजावट करणाऱ्या भाविकांसाठी २०२४ मध्ये आयोजित केलेल्या 'घरगुती गणेश सर्वोत्तम सजावट रिल्स स्पर्धे'च्या बक्षीस वितरण समारंभाचा भव्य सोहळा रविवारी उत्साहात पार पडला.

उत्तम उत्तूरे फाउंडेशन व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यासाठी मा.नगरसेविका प्रतिज्ञा उत्तुरे, सामाजिक कार्यकर्ते महेश उत्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला होता. गेल्या वर्षी या स्पर्धेला मोठा



प्रतिसाद मिळाला होता. त्या स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव करण्यासाठी हा समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला शिवसेना उपनेते संजय पवार, जिल्हा प्रमुख रविकिरण इंगवले, विजय देवणे,विशाल देवकुळे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. विजेत्यांना बक्षिसे व सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच विविध पदाधिकारी, मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमासाठी उत्तुरे फाउंडेशनचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांचे विशेष प्रयत्न लाभले.

# हुपरीत श्री गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन

**हुपरी : हॅलो प्रभात**

आप्पासाहेब नाईक (दादा) श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ऑगस्ट ते ५ सेप्टेंबर पर्यंत गणेश उत्सव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडात भारतीय स्वातंत्र्याचे प्रणेते लोकमान्य टिळक यांनी समाज प्रबोधन जनजागृतीच्या हेतूने सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात केली लोकांनी एकत्र येऊन सामाजिक विचार करावेत आणि त्यांच्या मनात सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी. हा उस्तव साजरा करण्यामागचा हेतू होता. या उपक्रमात चालू वर्षी १३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. लोकमान्य टिळकांच्या या उद्धात देहाला अनुसरून आम्ही सहकारातून समाज परिवर्तन करण्याचा एक भाग म्हणून आमच्या संस्थेमार्फत प्रतिवर्षी या उत्सवामध्ये व्याख्यानमाला आयोजित करून लोकांना विविध विषयाचे ज्ञान व माहिती नामवंत विचारवंताकडून देण्याचे कार्य चालू आहे यावर्षीही विविध क्षेत्रातील नामवंत विचारवंतांची व्याख्याने आयोजित केली आहेत. या व्याख्यान मालेला २८ ऑगस्ट पासून सुरुवात होत आहे हे व्याख्यानमालचे ४६ वे वर्ष असुनआम्ही ते साजरे करित आहोत. असे बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब भोजे, कार्यकारी संचालक शिवराज नाईक, उपाध्यक्ष शामराव गायकवाड, यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली हा कार्यक्रम एल. वाय. पाटील सभागृह पैसाफंड बँक हुपरी या ठिकाणी रोज सायंकाळी ६-३० वाजता आयोजित केलेला असून हा कार्यक्रम वेळेवरती सुरुवात होईल. तरी सर्व सभासद व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी अण्णासाहेब भोजे, शिवराज नाईक, नानासो गाट, आनंदराव उलपे, अप्पासाहेब देसाई, शीतलकुमार पाटील, श्रीकांत नाईक, यशवंतराव पाटील,अमर कुलकर्णी, प्रमोद गाट, व सर्व बँकेचे संचालक सभासद वर्ग उपस्थित होते.

# बाळासाहेब गुरव (बापू) हायस्कूल मध्ये नवागतांचे स्वागत

**कवठेमहंकाळ : जालिंदर शिंदे**

येथील श्री बाळासाहेब गुरव (बापू) हायस्कूल व ज्युनियर कॉलेज मध्ये इयत्ता अकरावीत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यातील येथील हेड कॉन्स्टेबल तथा वेटलिफ्टींग व पावरलिफ्टिंग नॅशनल चॅम्पियन सौ वैशालीताई कोळेकर होत्या तर अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब (बापू ) गुरव हे होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.तदनंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

तदनंतर नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.यावेळी बोलताना सौ वैशाली कोळेकर म्हणाल्या की एखादे ध्येय निश्चित करुन आपण त्यासाठी



प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास ते ध्येय आपोआप आपल्याला प्राप्त होत असल्याचे सांगितले तर संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब (बापू) गुरव म्हणाले की कोणतेही क्षेत्र हे कमी नसुन आपण निवडलेल्या क्षेत्रात प्रगती करणे यामध्येच खरी कसोटी व कौशल्य असल्याचे सांगून स्वतः मध्ये असलेल्या उपजत सुप्त गुणांना वाव देण्याचे आवाहन केले.

तर मुख्याध्यापक चंद्रकांत घाटे यांनी आपल्या भाषणात शाळेच्या आजवरच्या यशाचा लोखाजोखा मांडला.

यावेळी उपाध्यक्ष सुभाष जाधव,सचिव वैभव गुरव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी खजिनदार महादेव रसाळ,कवठेमहंकाळ पोलीस दलातील गोपनीय विभागाचे राकेश पाटील,संस्थेचे सीईओ शामराव माने, मुख्याध्यापक सी बी घाटे, पर्यवेक्षक एच बी पाटील,ज्युनिअर विभागाचे एन टी खोतसह शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन टी खोत यांनी तर सुत्रसंचलन सौ ऐ ऐ मोरे व सौ एस एस कुलकर्णी यांनी केले तर आभार एच बी बेंडे-पाटील यांनी मानले.

# गोरक्षकांचा अपमान सहन करणार नाही

## हिंदू एकता आंदोलनाचा इशारा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सदा खोत यांच्या गोरक्षकांविरोधातील वक्तव्याचा हिंदू एकता आंदोलन कोल्हापूर जिल्ह्याने तीव्र निषेध केला आहे. महाराष्ट्रात गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा लागू असून, गोरक्षकांचे कार्य पारदर्शक व कायदेशीर असल्याचे संघटनेने म्हटले आहे. सरकारने अशा वक्तव्य करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, खोत व कसाईखान्यांच्या संबंधांची चौकशी करावी आणि गोवंश हत्या कायद्याची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा राज्यभर आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला आहे.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली,कोल्हापूर,सातारा,सोलापूर,पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,**
**छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या**
**जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळविण्यासाठी संपर्क : **9021651976**